महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता दुरुस्ती प्रस्तावांबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१५/प्र.क्र.१०५/एसएम-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दिनांक: १९ ऑगस्ट, २०१५

वाचा

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)/माशि-१, दिनांक १५ जून, २०१३

२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. स्वयंअ-२०१३/(८५/१३)(II) /माशि-१, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१३

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७/एसएम-२, दि.२५ जून, २०१४

४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. एसएफएस-१०१४/प्र.क्र.२०७ भाग-१/एसएम २, दि.२८ ऑगस्ट, २०१४

प्रस्तावना

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ज्या शाळा पात्र म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. त्यामधील सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार *ठाणे, जळगाव, अहमदनगर, वर्धा,अमरावती, मुंबई, रायगड, पुणे जिल्ह्यातील ८ शाळांच्या बाबतीत* त्यांनी मूळ प्रस्तावामध्ये मागणी केल्यानुसार शाळेचा पत्ता, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक वा प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळा मंजूर झाल्या नव्हत्या. तसेच काही संस्थांनी त्यांच्या शाळेच्या नावात बदल, समावेश करण्याबाबत केलेले निवेदन, व उपरोक्त संस्थांच्या विनंत्याच्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाचे अभिप्राय/अहवालाच्या अनुषंगाने दुरुस्त्या करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरिता सोबतच्या विवरणपत्रानुसार *ठाणे, जळगाव, अहमदनगर, वर्धा,*

मुख्याध्यापक
प्रतिक विद्या निकेतन
सेमाई. ता. मावळ जि पुणे

Scanned with CamScanner

*अमरावती, मुंबई, रायगड, पुणे जिल्ह्यातील ८ शाळांच्या प्रस्तावात दुरुस्ती /सुधारणा करण्यास,* संदर्भाधीन शासन निर्णय दि. १५ जून, २०१३ , दि.५ ऑक्टोबर, २०१३, दि.२५ जून, २०१४ व दि.२८ ऑगस्ट, २०१४ मधील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, तसेच खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून याव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहेः-

१) शाळेने प्रस्तावित केलेली जागा/जमीन नियमानुसार किमान २ एकर सलग/अथवा शाळेसाठी योग्य/शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित असल्याची संबंधित शिक्षणाधिकारी यांनी खात्री करावी. सदर जागा/जमीन नियमानुसार आढळून न आल्यास संस्थेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनास सादर करावा.

२) दाननिधी (कायम मुदतठेव) पावती संस्थेच्या व संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचे संयुक्त नावाने शाळा मान्यतेचा प्रस्ताव दाखल केल्याच्या दिनांकापासून पुढील ३ वर्षाकरिता असणे आवश्यक आहे. मुदतीनंतर त्याचे नूतनीकरण करण्याबाबत संबंधित, संस्थेची /शाळा व्यवस्थापनाची व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांची जबाबदारी राहील. अशी कायम मुदतठेवीची मूळ पावती संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडे तारण म्हणून ठेवावी.

२. सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्था यांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण उपसंचालक यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०८१९१५००४४६३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Avinash Mahadeo Sable

Digitally signed by Avinash Mahadeo Sable
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Avinash Mahadeo Sable
Date: 2015.08.19 15:11:40 +05'30'

(अविनाश साबळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संबंधित महानगरपालिकांचे आयुक्त
३. संबंधित जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.



मुख्याध्यापक
प्रतिक विद्या निकेतन
निगडे. ता. मावळ जि. पुणे

Scanned with CamScanner

७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक.
९. संबंधित जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) .
१०.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषदा/नगरपालिका
११.मा. प्रधान सचिव (शालेय शिक्षण ) यांचे स्वीय सहायक
१२.निवडनस्ती (एसएम-२).

मुख्याध्यापक
वैदिक विद्या निकेतन
नाणे, ता. मावळ जि. पुणे



Scanned with CamScanner